विद्यापीठ संघात देगलूरच्याच खेळाडूंचा दबदबा

पाच खेळाडूंचा आंतरविद्यापीठ बॉल बॅडमिंटन स्पर्धेत सहभाग

देगलूर, पुढारी वृत्तसेवा : चेन्नई येथील [illegible] विद्यापीठात होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या संघात देगलूर महाविद्यालय देगलूरचे तीन खेळाडू व कुंडा महाराज महाविद्यालयाचे दोन खेळाडू असे एकूण पाच खेळाडूंची निवड झाली आहे. या निवडीने पुन्हा एकदा देगलूरच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठीय संघात आपला दबदबा कायम ठेवला आहे. दरम्यान विद्यापीठीय संघाचे प्रशिक्षण शिबिर २४ ते २८ मे दरम्यान देगलूर महाविद्यालयाच्या मैदानात संपन्न झाले.

चेन्नई येथील [illegible] विद्यापीठात होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या संघात देगलूर महाविद्यालय देगलूरच्या प्रमोद माळकापूरे, विशाल वाघमारे, गोविंद ईश्वरकर या तीन तर कुंडा महाराज महाविद्यालयाचे शेख इमरान व मानव शिरपुरे असे एकूण पाच विद्यार्थी खेळाडूंनी [illegible] कामगिरी करून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बॉल बॅडमिंटन संघात आपली निवड सार्थ ठरवत आपला दबदबा कायम ठेवला आहे.

दरम्यान या खेळाडूंना संघास विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. या विद्यापीठाच्या संघाचे प्रशिक्षक म्हणून डॉ. [illegible] व सहाय्यक प्रशिक्षक कांबळे मधुकर हे आहेत. या खेळाडूंचे महाविद्यालयीन [illegible] प्रमुख प्रा. वाघमारे [illegible], प्रा. दिलीप वडके, प्रा. [illegible] यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

या खेळाडूंचे [illegible] शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष [illegible], सहसचिव सूर्यकांत [illegible], कोषाध्यक्ष [illegible] व कार्यकारिणी सदस्य राजकुमार महाजन, डॉ. [illegible], [illegible] जोशी, [illegible], महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, पर्यवेक्षक प्रा. [illegible], कार्यालय अधीक्षक



गोविंद जोशी तसेच कुंडा महाराज प्रतिष्ठानचे सचिव राजेश महाराज देगलूरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी, उपप्राचार्य प्रा. संजय अग्रवाल, [illegible] प्रा. डॉ. [illegible], प्रा. डॉ. अभिमन्यू पाटील, मुख्य लिपिक [illegible] व सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.